REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ३ मे, १९४४ अंक १८

## दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

( स्थापना : १९१९ )

आम्हीं आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध
## मागोरा पिल्स
अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.
१६ गोळ्यांच्या डबीस रु. १
— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —
मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

→। दत्त कंपनी ।←
७२५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, बेलेवर
रिपेअर करून मिळतील.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : मोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ५,००,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिविडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

वी. व्ही. ओक,
B. Com., C. A. I. B. C. A. I. I. B.
मॅनेजर

## जाहीर नोटीस

धी औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कंपनी लि. चे भागीदारांच्या ता. ८-४-४४ रोजीं भरलेल्या विशेष साधारण सभेंत ठरलेंप्रमाणें कंपनीचें नांव ता. १-५-१९४४ पासून खालीलप्रमाणें होईल व त्याप्रमाणें त्या नांवानें पुढील व्यवहार सुरू होईल.

"दी बँक ऑफ औंध लिमिटेड"

कल्याण, ता. १।५।१९४४ इ.

बी. आर. वर्तक,
जनरल मॅनेजर.

## अन्नमहागाई निदर्शक नवे आंकडे

पैशाची किंमत स्वस्ताई–महागाईप्रमाणें बदलत जाते व हा फरक मोजण्याकरितां इंडेक्स नंबर्सचा उपयोग करण्यांत येतो. कांहीं प्रातिनिधिक जिनसांची निवड करून एका ठराविक वर्षाच्या त्याच्या सरासरी किंमतीस १०० असें मानण्यांत येतें व त्यानंतर दरमहा अथवा दरसाल ह्या मूळ किंमतीशीं तुलनात्मक असे आकडे तयार करून प्रसिद्ध केले जातात, त्यावरून भावांतील फरक, महागाई, रहाणीच्या खर्चाचें मान, इत्यादींतील सूक्ष्म फरक कळण्यास मदत होते. ज्यांच्या किंमतींची तुलना करावयाची, त्यांची निवड योग्य होण्यावरच इंडेक्स नंबर्सची उपयुक्तता अवलंबून रहाते. मनुष्याच्या आहारांत किंवा वापरांत जिन्नस ज्या प्रमाणांत जास्त आवश्यक असेल त्या प्रमाणांत त्याची पट करून हिशेब करावा लागतो. मिठाची किंमत दुप्पट होण्यानें मनुष्याच्या रहाणीचा खर्च जेवढा वाढेल, त्यापेक्षा तांदूळ अथवा ज्वारी ह्याची किंमत चढल्यानें तो कितीतरी अधिक वाढेल. हिंदुस्थानांतील अन्नाच्या किंमतीचे निदर्शक आंकडे आजच्या अपूर्व परिस्थितींत वस्तुस्थिति निदर्शक राहिलेले नाहींत, हें लक्षांत घेऊन सरकारनें २६ ऑगस्ट, १९३९ रोजींची तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, तूर, डाळ, चहा, कॉफी, साखर, गूळ व मीठ ह्यांची किंमत त्यांतील कांहीं बाबींचें आहारांतील विशेष महत्त्व ध्यानांत घेऊन १०० अशी मानली व त्या १०० शीं तुलना करणारे साप्ताहिक आकडे प्रसिद्धि करण्यास नुकतीच सुरुवात केली. त्याचे ताजे आकडे खालीं दिले आहेत, त्यावरून अन्नाच्या किंमतींत झालेला चढउतार ध्यानांत ठेवण्यास सहाय होईल.

२६ ऑगस्ट १९३९ रोजींची किंमत = १००

| अखेरचा आठवडा | नवा इंडेक्स नंबर |
|---|---|
| ५–२–४४ | २३८·६ |
| १२–२–४४ | २४३·२ |
| १९–२–४४ | २४७·१ |
| २६–२–४४ | २४४·७ |
| फेब्रुवारीची सरासरी | २४३·४ |
| ४–३–४४ | २४२·८ |
| ११–३–४४ | २३३·६ |
| १८–३–४४ | २३४·८ |
| २५–३–४४ | २३३·७ |
| मार्चची सरासरी | २३६·२ |
| १–४–४४ | २३१·८ |

## विविध माहिती

### सहशिक्षण बंद

रशियानें मुलगे व मुली ह्यांचें सहशिक्षण बंद केलें आहे.

### आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेंत रशिया कां नाहीं ?

फिलॅडेल्फिया येथें आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेचें अधिवेशन चालू आहे. राष्ट्रसंघाचें एक पिल्लू, ही त्या परिषदेची आजची स्थिति आहे ती पालटून संयुक्त राष्ट्रांची ती एक प्रातिनिधिक संस्था व्हावी, असें रशियाचें म्हणणें आहे व त्यासाठींच रशिया परिषदेंत भाग घेत नाहीं.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें २१ एप्रिल अखेर संपलेल्या आठवड्यांत ३६ कोटि, ९५½ लक्ष रुपये किंमतीच्या १,२३,७७४ चेक्सची देवघेव झाली.

### "आगीमुळें झालेलें नुकसान भरून देण्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं."

मुंबई शहरांतील ता. १४ एप्रिलचा स्फोट व आग ह्यामुळें झालेल्या नुकसानीच्या भरपाईची मागणी आगीच्या विमा कंपन्यांकडे आली असतांना, कंपन्या आज त्यांच्या माहितीप्रमाणें नुकसानभरपाईस जबाबदार नाहींत, असें उत्तर विमेदारांस देण्यांत आलें. विमापत्रकांतील अटी वाचल्या म्हणजे खुलासा होईल, असेंहि त्यांस कळविण्यांत आलें. झालेलें नुकसान विम्याच्या जोखमींत येत नाहीं, असा विमा कंपन्यांचा अभिप्राय आहे.

### सर्वांत जास्त पगाराचा धंदेवाईक

मेट्रो गोल्डविन मेयर कंपनीचे मि. लुई बे मेयर ह्यांची १९४२ सालीं प्राप्ती ११,३८,९९२ डॉलर भरली. अमेरिकेंतील सर्वांत जास्त पगाराचा धंदेवाईक, हें त्यांचें स्थान आज १० वर्षें टिकलें आहे.

### सी. पी. अँड बेरार चेंबर ऑफ कॉमर्स

वरील चेंबरचा उद्घाटन समारंभ ७ मे १९४४ रोजीं नागपूर येथें श्री. जी. एल. मेहता ह्यांचे हस्तें होणार आहे.

### इंडिया युनायटेड मिल्स लि.

पूर्वी मेसर्स ई. डी ससुन अँड कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीकडे व आतां मेसर्स अगरवाल अँड कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीकडे असलेल्या, इंडिया युनायटेड मिल्स लि. च्या ( पूर्वीच्या ई. डी. ससुन युनायटेड मिल्स लि. च्या ) गिरण्यांच्या गटानें १९४३ सालीं ११ कोटि, ६५ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री करून ३ कोटि, ४५ लक्ष रुपये नफा दाखविला. करापायीं ह्यांतील २½ कोटि रुपये खर्च होतील. ऑर्डिनरी भागीदारांस १२½% व डिफर्ड भागीदारांस ३१¼% डिव्हिडंड मिळालें. १९४१ सालचें डिव्हिडंडचे दोन्ही दर ६¼% होते.

### स्वीडन–जर्मन व्यापार

स्वीडननें जर्मनीकडे जाणाऱ्या आपल्या युद्धसाहित्याची निर्गत थांबवावी, अशी मागणी त्या देशाच्या सरकारकडे अमेरिकन सरकारनें केली, तिला स्वीडिश सरकारनें नकारार्थी उत्तर दिलें. संयुक्त राष्ट्रांची विनंति मान्य केल्यास स्वीडनच्या तटस्थतेचा भंग होईल, जर्मनीशीं असलेल्या व्यापारी कराराचाहि भंग होईल व स्वीडनच्या आयातींपैकीं ८१% आयात जर्मनींतून होते, तिचेवरहि त्याचा परिणाम होईल, असें स्वीडनचें म्हणणें आहे. स्वीडन जर्मनीला पाठवीत असलेल्या युद्धसहाय्यांत बॉल बेअरिंगचा समावेश होतो.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ महागाई निदर्शक आकडे | १३८ |
| २ विविध माहिती ... | १३८ |
| ३ नवी आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था ... | १३९ |
| ४ हायकोर्टाचा निर्णय ... व भाडेकरू ... | १४० |
| ५ स्फुट विचार ... ब्रिटिश सरकारचें अंदाज-पत्रक-मुंबई प्रांतास बाहेरून धान्य मिळालें पाहिजे-धान्य सल्लागार समितीच्या सूचना-वैमानिक वहातुक-बँक ऑफ औंध लि.-नव्या कंपन्यांची स्थापना | १४१ |
| ६ शेअर बाजार ... | १४२ |
| ७ शेड्यूल्ड बँक म्हणजे काय ? ... | १४३ |



# अर्थ

बुधवार, ता. मे ३, १९४४


## नवी आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था

युद्ध चालू असतांच मित्रराष्ट्रांनीं परस्पर देणें-घेणें आणि त्या बाबतची हुंडणावळ ह्यांचे संबंधांत विशिष्ट नियंत्रणात्मक व्यवस्था तात्पुरती केली आहे. पण युद्धसमाप्तीनंतर जगांतील सर्व देशांच्या परस्पर देण्याच्या फेडीची आणि तिच्या मुळाशी असावयाच्या आंतरराष्ट्रीय चलन प्रमाणाची कायमच्या स्वरूपाची योजना अमलांत यावी लागेल. युद्ध काळांत आंतरराष्ट्रीय देणींघेणीं कागदपत्रीं राहून जमेल त्या रीतीनें त्यांची विल्हेवाट करणें अपरिहार्य असतें. शांततेची परिस्थिति पुन्हां निर्माण झाली म्हणजे युद्ध काळांतले हिशेब पुरे करावयाचे असतात, एवढेंच नव्हे तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराची घडी बसवावयाची असते. मागील महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय देवघेवींच्या व हुंडणावळीच्या व्यवस्थेची सर्वमान्य अशी योजना तयार होऊं शकली नाहीं आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या अनुक्रमें पौंड स्टर्लिंग व डॉलर ह्या चलनाभोवती दोन मोठे राष्ट्रांचे गट बनले. जर्मनीनें युरोपांत आपल्या नेतृत्वाखालीं स्वतंत्र अशी योजना चालू केली. ह्या कटु अनुभवापासून बोध घेऊन इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं प्रस्तुत युद्धानंतर असला घोटाळा उडूं नये म्हणून अगोदरपासून आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेच्या चर्चेस प्रारंभ केला आहे. ह्या दोन राष्ट्रांच्या तज्ञांनीं स्वतःच्या दृष्टीनें योग्य दिसणाऱ्या योजना तयार केल्या. त्या दोहींचा मुख्य उद्देश एकच असला तरी त्यांच्या तपशीलांत महत्वाचे फरक दिसून आले आणि त्यांवर टीका-प्रति-टीका असे प्रकार आजवर बराच काळपर्यंत चालत आले आहेत. नियोजित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेंत स्वतःचें आर्थिक स्थान नीट रहावें आणि स्वतःचें वस्तान चांगलें बसावें अशी इंग्लंड व अमेरिका ह्यांची इच्छा असणें स्वाभाविक आहे. तीस अनुसरून त्यांच्या तज्ञांनीं योजनेच्या कांहीं वैशिष्ट्यांस महत्व दिलें असल्यास त्यांत नवल नाहीं. पहिल्या योजनांस मुरड घालून तज्ञांनीं सर्वमान्य होईल अशी एक नवी व्यवस्था तयार केली आहे आणि तिचा विचार करण्यासाठीं अमेरिकेंत एक परिषद् लवकरच भरणार आहे असें प्रसिद्ध झालें आहे. हिंदुस्थानच्या वतीनें प्रतिनिधी तीमध्यें उपस्थित होणार आहेत. परिषदेचे निर्णय लागू ठीक बंधनकारक होतील असें नाहीं कायम स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेस समाधानकारक आकार देण्यास तिच्यामध्यें होणाऱ्या चर्चेचा उपयोग होईल. तथापि, इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांच्यासारख्या बलाढ्य राष्ट्रांस मान्य होणाऱ्या चलन व्यवस्थेंत हिंदुस्थानासारख्या मागासलेल्या व दुर्बल देशाच्या हितसंबंधांचें रक्षण योग्य रीतीनें होईल ह्या विषयीं खबरदारी घेण्यांत आली पाहिजे.

युद्धापूर्वी सुवर्ण परिमाण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पद्धती चालू होती तेव्हां देशांच्या चलनाचें मोल सोन्यामध्यें व्यक्त होत होतें आणि त्यांची परस्परांचीं देणींघेणीं ह्या प्रमाणबद्ध हिशेबानें भागवलीं जात असत. प्रस्तुत युद्धानंतर सुवर्ण परिमाणाचा त्याग केला जाणार नाहीं, पण सोन्याचा पुरवठा अमेरिकेवांचून अन्य देशांचे जवळ उरला नसल्यानें त्यांस प्रसंग पडेल तेव्हां सोनें निर्गत करून आपलें देणें भागवतां येणार नाहीं म्हणून सुवर्णाचा आधार कायम ठेवून कर्जफेडीची दुसरी कांहीं व्यवस्था केली पाहिजे. ह्या नव्या योजनेंत किंमतींचें सामान्य माप सोन्यामध्यें निश्चित केलें जाईल खरें, तथापि आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याची वजावाट सोन्यांत व्हावयाची नाहीं. ह्याकरितां एक आंतर-राष्ट्रीय फंड निर्माण केला जाईल आणि त्यांत सोनें व हुंड्या घालण्यांत येतील. इंग्लंड व अमेरिका ह्यांचा हिस्सा अर्थातच मोठा राहील. राष्ट्रांशीं देणीं व घेणीं ह्या फंडाच्या हिश्शांत त्यांच्या खात्यावर नमूद करण्यांत येतील आणि त्यांच्या जरुरीप्रमाणें देशाची कर्ज फेडीची सोय केली जाईल आंतर राष्ट्रीय व्यापार सुरळीत रीतीनें चालावा आणि सोन्याचा पुरवठा तोकडा पडला म्हणून देशांचें अडूं नये हा ह्या व्यवस्थेचा हेतु आहे. आंतरराष्ट्रीय फंडाचें कार्य राष्ट्रीय मध्यवर्ती बँकांच्या मार्फत केलें जाईल. त्याचा उपयोग आर्थिक पुनर्घटना किंवा आंतरराष्ट्रीय कर्जफेड ह्यांसाठी केला जाणार नाहीं. भांडवल गरजू राष्ट्रांच्या उद्योगधंद्यांच्या अभिवृद्धीकरितां पुरवणें हा येथें उद्देश नसून देशादेशांत होणाऱ्या व्यापारास लागणाऱ्या पतीच्या पैशाची व्यवस्था करणें हा मुख्य हेतु आहे. फंडाच्या व्यवस्थापकांनीं कोणत्याहि राष्ट्राच्या अंतर्गत आर्थिक धोरणावर टीका करावयाची नाहीं किंवा त्यांत ढवळाढवळ करावयाची नाहीं. कोणत्याहि सभासद राष्ट्रास फंडाच्या व्यवस्थेंतून बाहेर पडतां येईल. त्यानें फंडाचें देणें देऊन टाकलें म्हणजे झालें. दुसऱ्या राष्ट्रावरील हुंड्या कांहीं मर्यादेपर्यंत आंतरराष्ट्रीय फंडांतून सभासदांस मिळू शकतील. हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर काय राहील ? ह्या देशाचा व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे दृष्टीनें तो अनुकूल असेल किंवा नाहीं ? हिंदुस्थानच्या मोठ्या शिलका लंडनमध्यें पौंड-स्टर्लिंगमध्यें जमल्या आहेत, त्या इकडे कशा परत येतील ? नवीन योजनेचा येथील बाजारभावावर कोणता परिणाम होईल ? इत्यादि प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें मिळाल्यावांचून आंतर-राष्ट्रीय फंडाच्या योजनेसंबंधानें मतप्रदर्शन करणें कठिण आहे. हिंदुस्थान आतां पूर्वीप्रमाणें कर्जको देश राहिला नसून त्याचे इंग्लंडमधून कोट्यवधि रुपये येणें झालें आहेत हें येथे लक्षांत ठेवलें पाहिजे. पौंड स्टर्लिंगवर आधारलेलें चलन वापरणाऱ्या ब्रिटिश वसाहतींसारख्या देशांचा गट सध्याप्रमाणें पुढेंहि व्यवहार करीत राहूं शकेल किंवा त्याचें स्वतंत्र अस्तित्व नवीन योजनेप्रमाणें शक्य होणार नाहीं असा प्रश्न कॉमन्स सभेंत विचारण्यांत आला असतां स्टर्लिंग गट

अबाधित रहाण्यास हरकत नाही असें उत्तर ब्रिटिश फडनविसांनी दिलें. अमेरिकेंत आंतरराष्ट्रीय चलनयोजनेवर प्रतिकूल टीका होत आहे तर इंग्लंडमध्यें तिचे विषयीं समाधान व्यक्त केलें जात आहे. स्वतःच्या हिताच्या दृष्टीनें हिंदुस्थाननें ह्या योजनेची छाननी करण्याचें महत्त्व किती आहे याची ह्या परिस्थितीवरून कल्पना येईल.

## मुंबई हायकोर्टाचा निर्णय व त्याचे भाडेकरूंवरील परिणाम

(ले.:–श्री. भी. वि. गाडगीळ, एम. ए., एलएल. बी., वकील, अध्यक्ष, पुणें घरभाडेकरू संघ)

मुंबई हायकोर्टानें भाडेकरू व मालक यांच्या संबंधांत जो नुकताच एक निर्णय दिला त्यामुळें मोठमोठ्या शहरांतील घरमालक व भाडेकरू वर्गांत बरीच खळबळ उडून गेली आहे.

१९३९ च्या सप्टेंबरांत महायुद्धाची घोषणा झाल्यापासुन युद्धकालीन परिस्थिति आटोक्यांत आणण्याकरितां व युद्धप्रयत्न जोरांत चालावेत म्हणून भारतसंरक्षण कायदा १९३९ मध्यें जारी करण्यांत आला व त्या कायद्याखालीं जीवनांतील निरनिराळ्या गरजांचें नियंत्रण क्रमाक्रमानें करण्यांत आलें व त्यांतच १९४२ सालीं मुंबई इलाख्यांत घरभाड्यांचें नियंत्रण करण्यांत आलें. त्याकरितां १९४२ चा घरभाडें नियंत्रण हुकूम प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

हा हुकूम भारतसंरक्षण कायद्याखालीं जे नियम तयार करण्यांत आले आहेत त्या नियमांपैकीं नियम ८१ पोट नियम २ पोट भाग बब व फ या अन्वयें जे अधिकार प्रांतिक सरकारांना दिले आहेत त्या अन्वयें काढला आहे. हा हुकूम प्रथमतः मुंबई शहरास २१–४–१९४२ रोजीं लागू करण्यांत आला व त्यानंतर जसजशी जरूर वाटली त्याप्रमाणें प्रांतांतील निरनिराळ्या शहरांना लागू करण्यांत आला व त्याप्रमाणें पुणें शहर व उपनगर यांस हा हुकूम २० जुलै १९४२ रोजीं लागू करण्यांत आला.

भारत संरक्षण कायद्यानें निर्माण केलेला हा हुकूम व १९३९ मध्यें कॉंग्रेस सरकारच्या अमदानींत तयार झालेला मुंबई भाडें नियंत्रण कायदा अशा दोन कायद्यांतील कलमांप्रमाणें मुंबई शहरांतील घरभाड्याचें नियंत्रण १९४२ पासून होऊं लागलें.

१९३९च्या कॉंग्रेस सरकारच्या कायद्यानें ८० रुपयां खालील भाडेकरूंच्या भाडेवाढीविरुद्ध निर्बंध घालण्यांत आले. १९४२ सालच्या हुकुमान्वयें ८० रुपयांवरच्या भाडेकऱ्यांबाबतही निर्बंध घालण्यांत आले. ही झाली मुंबई शहरापुरती बाब. परंतु मुंबईशिवाय इतर पुणें, सोलापुरसारखीं जी ठिकाणें ह्या हुकुमाच्या कक्षेंत आलीं त्यांना १ रु.पासून कितीहि रुपयांपर्यंत हा एकटाच हुकूम लागू लागला व त्याच्या जोरावर भाडेकऱ्यांना कांहीं विशिष्ट हक्क प्राप्त झाले.

ह्या हुकुमांत स्टँडर्ड रेंट ठरविलें आहे व त्या ठराविक भाड्याहून जास्त भाडें घेऊं नये असा सर्व साधारण नियम केला आहे. ठराविक भाड्याची व्याख्या अशी करण्यांत आली आहे कीं, जागेचें भाडें १९४० च्या सप्टेंबरांत जें असेल तें त्या जागेचें ठराविक भाडें समजण्यांत यावें व त्याहून जास्त भाडें घेण्यास या हुकुमानें बंदी केली आहे.

ह्याच हुकुमानें जिल्हानिहाय भाडेंनियंत्रणासाठीं एक एक अधिकारी नेमला असून त्यास रेंट कंट्रोलर असें म्हटलें आहे.

याप्रमाणें व्याख्या असून कलम ४ प्रमाणें ह्या हुकुमापूर्वी रगअ नंतर जी भाड्यांत वाढ झाली असेल ती वसूल करतां येणार नाहीं असें म्हटलें आहे व त्याकरतां कांहीं अपवाद सांगितले आहेत.

या हुकुमाच्या कलमांची अंमलबजावणी व्यवस्थित व्हावी म्हणून कलम ८ मध्यें अशी योजना केली कीं, भाडेकरू जर ठराविक भाडें नियमित देत असला व त्याचें भाडें थकलें नाहीं तर मालकाला भाडेकरूकडून घराचा कबजा मागतां येणार नाहीं. परंतु जर मालकाला स्वतःला जागा पाहिजे असेल किंवा भाडेकरूचा शेजाऱ्यांना उपद्रव होत असेल व तसें सर्टिफिकेट रेंट कंट्रोलर कडून मिळत असेल तर भाडेकरूंस कायदेशीर रीत्या काढून टाकतां येईल.

कलम ९ मध्यें, याप्रमाणें मालकानें सर्टिफिकेट मिळविलें व पुढें ज्या कारणाकरतां सर्टिफिकेट मिळविलें त्याकरतां जर ती जागा वापरली नाहीं व तीन महिन्यांत दुसऱ्या भाडेकऱ्यास जर जागा दिली तर मूळ भाडेकऱ्यांस ती जागा रेंट कंट्रोलरकडे अर्ज करून मागतां येते.

कलम १० मध्यें, जादा भाडें दिलें असल्यास तें भाडेकरूस परत घेतां येतें असें म्हटलें आहे व कलम ११ मध्यें १९४० च्या नंतर बांधलेल्या इमारतींचें भाडें ठरविण्याचा अधिकार रेंट कंट्रोलर यास देण्यांत आला आहे.

कलम १२त अपीलाचा अधिकार कलेक्टरकडे देण्यांत आला आहे.

स्थूलमानानें भाडें नियंत्रण हुकुमाची रचना वरीलप्रमाणें आहे.

ह्या हुकुमाच्या कक्षेंत येणाऱ्या वाटलु मॅन्शन या मुंबईतील इमारतीमध्यें राहणाऱ्या भाडेकरूमधील व इमारतीचे मालक मोर्वीचे महाराजा यांच्यामधील दाव्याच्या अपीलांत मुंबई हायकोर्टानें ह्या हुकुमांतील कलम ८, ९ व १२ हीं कलमें बेकायदा ठरविलीं आहेत. अर्थात् या निकालानें मुंबई शहरांतील ८० रु. वर भाडें देणाऱ्या भाडेकरूंची व मुंबई बाहेरील सर्व भाडेकरूंची मोठी दुर्दशा होणार आहे. खुद्द मुंबई शहरांत ८० रु. खालील भाडेकरूंना या निकालापासून कांहींच त्रास पोंचणार नाहीं. कारण त्यांना १९३९ सालचा कायदा लागूं आहे व त्यानें त्यांचें संरक्षण चांगलें होत आहे.

मुंबई हायकोर्टानें हुकुमांतील फक्त ८, ९ व १२ एवढींच कलमें बेकायदा ठरविलीं आहेत व त्यामुळें नियमित भाडें दिलें म्हणजे मालकांची पर्वा करण्याचें बिऱ्हाडकरूंना कारण उरलें नव्हतें ती परिस्थिति गेली. आतां मिळकतीच्या कायद्याप्रमाणें जरूर असणारी १५ दिवसांची नोटीस दिली कीं, भाडेकरूंना घरांतून काढून टाकतां येईल व त्यामुळें या युद्धकाळांतील इतर हालांत लोकांवर रस्त्यांत उघडे पडण्याची भीति उत्पन्न झाली आहे.

याप्रमाणें जरी कलम ८, ९ व १२ हीं बेकायदा ठरलीं असलीं तरी बाकीचा हुकूम अंमलांत आहेच व त्या हुकुमाप्रमाणें मालकांना भाड्यांत वाढ मात्र करतां येणार नाहीं व एक भाडेकरी काढून त्या जागीं दुसरा ठेवून जास्त भाडें काढतां येणार नाहीं. कारण जागेच्या भाड्यांत वाढ करण्यास या हुकुमानें बंदी केली आहे.

भाडेकरूंवर ओढवणाऱ्या या दुर्दशेंतून वाट काढण्याकरतां १९३९ सालचा मुंबई शहरांत लागूं असलेला कायदा सर्वत्र लागू केला तर भाडेकऱ्यांचे हाल मोठ्या प्रमाणावर वांचणार आहेत. त्या कायद्यांत रेंट कंट्रोलचे अधिकार कोर्टांस देण्यांत आले आहेत व त्याबद्दल कोणाची तक्रार असणार नाहीं.

असा नवीन हुकूम अगर कायदा तावडतोब सर्वत्र अंमलांत येणें अत्यावश्यक आहे.

## स्फुट विचार

### ब्रिटिश सरकारच्या अंदाजपत्रकांत सुमारें ३ अब्ज कोटींची तूट

ब्रिटिश सरकारचें अंदाजपत्रक कॉमन्स सभेस सादर करतांना फडनवीस, सर जॉन अँडरसन, ह्यांनीं, गेल्या वर्षीच्या उत्पन्न-खर्चाचा आढावा घेतला. एकूण उत्पन्न अपेक्षेपेक्षा १३ कोटि, १० लक्ष पौंड अधिक येऊन त्याची रकम ३ अब्ज, ४ कोटि पौंड भरली. उत्पन्नापेक्षा खर्च २ अब्ज, ७६ कोटि पौंडांनीं अधिक झाला. सरकारास २$\frac{3}{4}$ अब्ज पौंडांचें कर्ज काढावें लागलें. बीर दारू व तंबाखू ह्यांवरील करांत आणखी वाढ केली, तरी ह्या जिनसांचा खप वाढला व अपेक्षित करापेक्षा त्यांनीं १ कोटि, ८० लक्ष पौंड जास्त दिले. ग्रेट ब्रिटनमधील रहाणीच्या खर्चाचें प्रमाग युद्धपूर्व सालाचे मानानें फक्त २८% वाढलें आहे. किंमती आवाक्यांत ठेवण्याचे बाबतींत ग्रेट ब्रिटनला किती यश आलेलें आहे, हें ह्यावरून सिद्ध होतें. युद्धोत्तर काळांत, उत्पादनाचा उठाव ग्रेट-ब्रिटनमध्येंच होऊं देण्यापेक्षा निर्गत व्यापारास प्राधान्य देण्याचें महत्त्व सर जॉन अँडरसन ह्यांनीं प्रतिपादन केलें व उद्योगधंद्यांस सरकार मदत करील, असें आश्वासन दिलें. १९४४–४५ मधील ब्रिटिश सरकारी खर्चाचा अंदाजी आकडा ५ अब्ज, ९४ कोटि पौंड आहे. उत्पन्न ३ अब्ज, १० कोटि पौंड भरेल व उत्पन्न–खर्चांत येणारी तूट कर्ज उभारून भागविण्यांत येईल. एकूण खर्चापैकीं निम्म्या खर्चाची भरपाई करांच्या वसुलींतूनच होईल, हें एक वैशिष्ट्य आहे. खर्चाच्या रकमेपैकीं एवढी मोठी रकम चालू उत्पन्नांतून भागवितां येण्याजोगी ग्रेट ब्रिटनची चांगली परिस्थिति आहे किंवा तेथील लोक एवढा स्वार्थत्याग करून युद्धाचा शेवट जवळ आणण्यास सहाय करीत आहेत, असा त्याचा अर्थ आहे. चलनविस्ताराचा अवलंब न करतां बचतीमधून व अन्य मार्गांनीं खर्च भागविणें ग्रेट ब्रिटनच्या आवाक्यांत आहे, असें त्यांनीं सांगितलें.

---

### मुंबई प्रांतास बाहेरून धान्य मिळालें पाहिजे

शिधापद्धतीचा उपक्रम यशस्वी करून दाखवल्याचें श्रेय मुंबई प्रांतानें संपादलें आहे आणि त्याचा धडा दुसरे प्रांत गिरवीत आहेत. आपली धान्याची नैसर्गिक तूट भरून काढण्याची आणि त्याची वाटणी शक्य तितकी समाधानकारक करण्याची शिकस्तहि ह्या आमच्या प्रांतानें चालवली आहे. शक्यतोंवर स्वतःच्या पायावर उभें राहून परावलंबन कमी करावें हा त्या व्यवस्थेचा हेतु आहे. प्रांतिक गरज भागवण्यास पुरें इतकें धान्य उत्पन्न करण्याची व्यवस्था मुंबई सरकारनें केली आहे आणि बाहेरून धान्य येण्याची आवश्यकता आतां उरलेली नाहीं असें अनुमान मात्र ह्यावरून काढलें जाऊं नये अशी काळजी घेण्यांत आली पाहिजे. तुटीच्या प्रांतांस धान्य पुरवण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारची आहे आणि मुंबई प्रांत स्वतःचें उत्पादन वाढवून त्याची खरेदी आणि वाटणी योजनात्मक रीतीनें करीत आहे ह्याचा अर्थ बाहेरून पुरवठा होण्याची येथें आवश्यकता नाहीं असा मुळींच नाहीं. ह्या दृष्टीनें पहातां प्रांतिक अन्नसल्लागार समितीनें मुंबई सरकारास गेल्या आठवड्यांत भरलेल्या आपल्या सभेंत प्रस्तुत प्रश्नाबाबत केलेली सूचना महत्वाची आणि योग्य आहे. मध्यवर्ती सरकारानें मुंबई प्रांतास बाहेरून धान्य आणून पुरवण्याचें अगत्य प्रांतिक सरकारानें त्या सरकारच्या मनावर ठसवावें असा सल्लागार समितीचा आग्रह आहे. स्वतः विशेष खटपट न करतां तुटीची ओरड करणाऱ्या प्रांताकडे मध्यवर्ती सरकारचें लक्ष प्रामुख्यानें जाईल आणि मुंबई प्रांताच्या गरजेकडे दुर्लक्ष होण्याचा संभव आहे म्हणून हिंदुस्थान सरकारकडे प्रांतिक सरकारनें तगादा लावला पाहिजे आणि त्यांचेकडून शक्य तेवढें धान्य मिळवलें पाहिजे.

---

### धान्य सल्लागार समितीच्या सूचना

जमीनदारांनीं आपल्या शेतांच्या विशिष्ट भागांत धान्याचीं पिकें काढलीं पाहिजेत आणि बिगर धान्याचीं पिकें करतां कामा नयेत अशी सक्ती करणारा कायदा मुंबई सरकार करीत आहे ह्यावरून धान्य पुरवठ्याच्या बाढीची शिकस्त ह्या प्रांतांत कशी होत आहे याची कल्पना येईल. धान्याच्या उत्पादनाचा विस्तार हा प्रांतिक जनतेच्या जीवनाचा जिव्हाळ्याचा प्रश्न असल्यानें अशा प्रकारची सक्ती समर्थनीय ठरते. तथापि हें नियंत्रण आणि विशिष्ट मर्यादेपलीकडील उत्पादन शेतकऱ्यानें सरकारास ठराविक भावानें विकलें पाहिजे अशी करण्यांत येणारी सक्ती हीं आवश्यक असलीं तरी ह्या धोरणाचा परिणाम धान्य पिकवणारांवर काय होतो आणि त्यानें करावयाच्या स्वार्थत्यागास कोणत्या मर्यादा आहेत ह्याचा विचार होणें आवश्यक आहे. धान्याच्या उत्पादकांस दिल्या जाणाऱ्या किंमती आणि शेतकऱ्यांस स्वतः-च्या धंद्यास व उपजीविकेस येणारा खर्च ह्यांचा तुलनात्मक दृष्टीनें हिशेब केला जाऊन अधिक धान्य पिकवण्यास लागणारें सहाय सरकारनें पुरवलें पाहिजे. धान्यांच्या किंमतींची अनिश्चितता, जरूरीच्या जिनसांची महागाई, आउतें, बीं, खत, बैल इत्यादींची दुर्मिळता ह्या गोष्टी सरकारनें लक्षांत घेऊन त्यांचे बाबतींत शेतकऱ्यांस मदत व सवलती देणें आवश्यक आहे. प्रांतिक अन्न सल्लागार समितीनें शेतकऱ्यांच्या अडचणी पुढें मांडून त्यांचे निवारणार्थ सरकारास उपयुक्त सूचना केल्या आहेत. शेतकऱ्यांकडून सक्तीनें धान्य जमा करण्याची योजना लोकांस नीट समजली पाहिजे आणि ह्यासाठीं तिला योग्य प्रसिद्धी देण्यांत आली पाहिजे ह्यावर सल्लागार समितीनें जोर दिला आहे. शहरें आणि मोठीं गांवें ह्यांत देण्यांत येणाऱ्या शिध्याचें परिमाण व त्यांतल्या धान्यांचें प्रमाण ह्यांत एकसूत्रीपणा असावा असेंहि तिनें सुचवलें आहे.

---

### हिंदुस्थानांतील वैमानिक वहातूक

युद्धसमाप्तीनंतर वैमानिक वहातुकीचा प्रश्न महत्वाचा होणार आहे. हिंदुस्थान सरकारनें विमानगृहांच्या बांधणीसाठीं १० वर्षांत १५$\frac{1}{2}$ कोटि रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. एक लाखापेक्षा जास्त वस्तीच्या ५५ शहरांपैकीं ४६ शहरांजवळ विमानगृहें तयार केलीं जातील. त्याचप्रमाणें ५० हजार लोकवस्तीच्या गांवांपैकीं २९ गांवांजवळ व ५० हजारांखालील लोकवस्तीच्या गांवांपैकीं ३६ गांवांजवळ विमानगृहें बांधण्यांत येतील. ह्या १११ विमानगृहांपैकीं ९१ आजच चालू आहेत व २४ नव्यानें बांधण्यांत येतील. कराची येथील विमानगृहाला असून १००

प्रवाशांना पुरेल एवढें मोठें हॉटेल उभारण्यांत येईल. कलकत्ता, दिल्ली व मुंबई येथें उभारावयाच्या हॉटेलांत प्रत्येकीं ५० उतारूंची सोय होईल. १११ विमानगृहांच्या व्यवस्थेसाठीं मोठे अधिकारी, मजूर मिळून सुमारे ७,००० लोक कामावर ठेवावे लागतील.

---

## दि बँक ऑफ औंध लि.

औंध स्टेट सेंट्रल बँक लि. चा व्यवहार १९३८मध्यें औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कं. लि. नें १९३८ मध्यें आपल्या ताब्यांत घेतला व विमा खाता सुरू केली. तथापि, विमा विभागांत व औंध स्टेट प्रॉ. इं. कंपनीच्या भाग भांडवलांत कंपनीचे पैसे अडकून पडले. विमा व्यवसायाच्या ह्या प्रयोगाचा बँकिंग विभागावर ताण पडूं लागला व त्याचा दुष्परिणाम कंपनीस भोगावा लागून तिजेवर प्रमाणाबाहेर आर्थिक जबाबदाऱ्या व अडचणी आल्या. कंपनीनें वेळींच १९४१ सालीं औंध म्यूच्युअल ॲ. सोसायटी लि. ची स्थापना करून तिला सढळपणें सहाय केलें. कंपनीचा बँकिंग विभाग पूर्वीपासून फायदेशीर होताच, तो पुनः वाढीला लागला. कंपनीचें वसूल भांडवल व फंड्स ह्यांचें एकूण खेळत्या भांडवलाशीं पडणारें प्रमाण समाधानकारक आहे व तिचेकडील ठेवीहि वाढत आहेत. अशा रीतीनें, कंपनीचें पाऊल, मध्यंतरीच्या अडचणी दूर होऊन, जोमानें पुढें पडत आहे. विमा खातें बंद केलें तरी, कंपनीच्या नांवांत बदल करण्याचें राहिलें होतें. हा फरक आतां करण्यांत आला असून, "बँक ऑफ औंध लि." ह्या भारदस्त नांवाखालीं कंपनीचा व्यवहार ह्यापुढें चालणार आहे. बँकेची अखंड प्रगति होवो.

---

## कंपन्यांच्या स्थापनेसंबंधांत नवें धोरण

मे १९४३ मध्यें हिंदुस्थान सरकारनें ९४ वा डिफेन्स ऑफ इंडिया नियम म्हणून नव्या कंपन्यांचे स्थापनेवर एक बंधन जाहीर केलें व मध्यवर्ती सरकारचे पूर्णसंमतीशिवाय भांडवल उभारण्यास व जाहीर रीतीनें रोखे विकण्यास बंदी केली. युद्धानंतरच्या काळांत ज्या कंपन्या टिकण्याचा संभव नाहीं, अशा कंपन्या अस्तित्वांत येणेंच अशक्य करून पैसे गुंतविणारांचे हितसंरक्षण करणें प्रस्तुत नियमाचा उद्देश असल्याचें प्रसिद्ध झालें होतें. युद्धपरिस्थिति थोडीशी निवळतांच औद्योगिक उत्पादनाच्या वाढीस वाट पहावी न लागतां तें हातीं घेण्यासाठी चांगल्या कंपन्या सुसज्ज असाव्या ह्या दृष्टीनें भांडवल उभारणीवरील निर्बंध थोडेसे ढिले करण्याचें हिंदुस्थान सरकारनें आतां ठरविलें आहे. सध्यां नव्या योजना हातीं घेणें अशक्य आहे, परंतु युद्धोत्तर काळांत त्या हातीं घेण्याची पूर्वतयारी करणें आवश्यक आहे. अशा योजनांसाठी भांडवल उभारणीस आतां परवानगी मिळणार आहे. उभारलेलें भांडवल तूर्त सरकारी रोख्यांतच गुंतवावें लागेल.

---

## स्वदेशी मिल्स लि.

मुंबई (कुर्ला) येथील स्वदेशी मिल्स कं. च्या १९४३ मधील १ कोटि, १३¾ लक्ष रुपयांच्या नफ्यापैकीं कर व सक्तीची ठेव ह्यांची तरतूद करून १६½ लक्ष रुपये उरले त्यांतून भागीदारांस करमाफ ३५% डिव्हिडंड मिळालें. टाटा सन्स लि. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे. मिलमध्यें ७९,२८८ चात्या व २,१५० माग आहेत.

---

## शेअर बाज़ार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्.)

**अपोलो**—गिरणीचा अहवाल नुकताच हातीं आला तो समाधानकारक आहे असें दिसून येईल. गिरणीला १९४३ च्या डिसेंबर अखेर संपणाऱ्या वर्षांत एकूण पंचेशी लाख, वीस हजारावर नफा झाला असून त्यापैकीं जादा नफ्यावरील कर भरणीला ५९ लक्ष रुपये बाजूला काढावे लागले असून पांच लाख घसारा टाकण्यांत आला आहे. भागीदारांच्या वांटणीला एकूण १९,४२,२९९ रुपये आलेले असून पूर्वी शेअरला तीन आणे नफा वाटलेला आहे व नवीन आणखी तीन आणे मिळणेचा आहे. मागील वर्षी भागीदारांना करमाफ ४॥ आणे व यंदा सहा आणे करमाफ वाटण्यांत आले आहेत. शेअरचा चालूं भाव रु. ५ सव्याज घ्यानांत घेतां गुंतविणाराला सुमारें ७॥ टक्के करमाफ व्याज सुटेल.

ताळेबंदांतील विशेष गोष्ट ही की, मूळ मालमत्तेची किंमत जी सुमारें ८० लाखापर्यंत ती आज फक्त २९,३८,७२९ पर्यंत कागदावर दाखविण्यांत येत आहे. हें निःसंशय मजबुतीदर्शक आहे.

तसेंच नफ्यापैकीं दहा लाखावर रक्कम पुढील सालाकरतां ओढण्यांत आलेली आहे. गिरणीच्या एकूण २५ लाख (प्र. रु. २ च्या) विभागावर सहा आणे प्रमाणें व्याज देण्यास फक्त ९,३७,५०० रु. लागतात. म्हणजे आज गिरणीजवळ पुढील सालचे सहा आणे भागीदारांना देण्यास नगद शिल्लक आहे. याचा अर्थ असा कीं मंदीवाले मंडळींनीं कापडाचें भाव पडणार, व्याजें कमी होणार, म्हणून कितीही रान उठविलें तरी नवीन सालचे होणाऱ्या नफ्यांतून ही गिरणी सर्व कर, घसारा, इत्यादि देणी देऊन टाकून व्याज कायम राखूं शकेल. पुण्याकडच्या मंडळीजवळ बरेच अपोलोचे शेअर्स आहेत व आज बरेच दिवस भाव पडून असल्यामुळें गुंतविणारे सचिंत दिसत असत, त्यांना सांगावेसें वाटतें कीं बाजार गप्पावर लक्ष न देतां आपल्या शेअर्सना चिकटून रहावें. सध्यांच्या अनिश्चित लढाईच्या वातावरणामुळें बाजार मंद आहेत पण एकादे वेळेस दिवाळीच्या सुमारास बाजार हुरुपांत येतात त्या वेळेस हा शेअर उचल खाल्ल्याशिवाय रहाणार नाहीं.

विमा कंपन्यांनीं स्फोटामुळें झालेली नुकसानी भरून देण्याचें नाकारल्यामुळें विमाशेअर पुन्हा मजबुतींत आहेत.

इकडील गुंतविणारांचे मद्रासकडील मिडलँड रबर या कंपनीच्या (मूळ रु. १०) १७ रु. च्या आसपास मिळणाऱ्या व १॥ रु. व्याज देणाऱ्या कंपनीकडे लक्ष वेधावेसें वाटतें. साधारण रबर कंपन्यांची भांडवलें ,२।३ लाखापर्यंत असतांना या कंपनीचें भांडवल १२ लाखापर्यंत असून ही कंपनी लवकरच आणखी एक 'राणी' नांवाचा मळा घेणार आहे व त्याकरता आणखी भांडवल वाढविणार आहे. कंपनीचे चालक प्रसिद्ध ए. व्ही. थॉमस ही कंपनी असून, कंपनीजवळ १०॥ लाखांची जिंदगी व दोन लाखांवर गंगाजळी आहे. सिलोनी रबराचे भाव नुकतेच वाढविण्यांत आले आहेत व इकडील भावही वाढण्याचा बराच संभव आहे हें लक्षांत घेतां हा शेअर भरपूर व्याज व भांडवली वाढ दिल्याशिवाय राहणार नाहीं.

२

## " शेड्यूल्ड " बँक म्हणजे काय ?

कित्येक हिंदी बँकांच्या जाहिरातींत " शेड्यूल्ड " बँक म्हणून प्रामुख्यानें लिहिलें जातें व कित्येक बँका आपणांस " शेड्यूल्ड " बँकेचा दर्जा प्राप्त झाल्याचें विशेषत्वानें जाहीर करतात. हा दर्जा कोणत्या प्रकारचा असतो ? बँकेस शेड्यूल्ड बँकांच्या यादींत स्थान मिळालें, एवढ्यानें तिच्या परिस्थितीसंबंधीं कांहीं अनुमान काढतां येतें काय ? वगैरे प्रश्न नेहमी विचारण्यांत येतात.

हिंदुस्थानांत मध्यवर्ती (रिझर्व्ह) बँकेच्या स्थापनेपासून, जॉइंट स्टॉक बँकांची दोन मुख्य वर्गांत विभागणी केली जाते--शेड्यूल्ड बँका व शेड्यूलमध्यें नसलेल्या बँका. रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या शेड्यूलमध्यें (परिशिष्टांत) ज्यांचा समावेश केलेला आहे, अशा बँकांना शेड्यूल्ड बँका म्हणतात व उरलेल्या बँका नॉन--शेड्यूल्ड बँका असतात. ह्या दुसऱ्या परिशिष्टांत बँक दाखल होण्यापूर्वी बँकेनें कोणत्या अटी पार पाडल्या पाहिजेत, हें रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४२ (६) ह्या कलमांत सांगितलेलें आहे. (१) ब्रिटिश हिंदुस्थानांत बँकिंगचा धंदा करणाऱ्या व (२) ज्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची मिळून "किंमत" किमान पाच लक्ष रुपये आहे व (३) ज्यांस कंपनी कायद्याच्या २ (२) कलमाप्रमाणें कंपनी म्हणतां येते किंवा हिंदुस्थानाबाहेरील कायद्यान्वयें ज्या कंपन्या नोंदण्यांत आलेल्या आहेत, अशा वरील तीनहि अटी पुऱ्या करणाऱ्या बँकांस," शेड्यूल्ड " बँकांच्या यादींत स्थान मिळूं शकतें.

### शेड्यूल्ड बँकांची वर्गवारी

शेड्यूल्ड बँकांच्या यादींत १९४३अखेर७७बँका होत्या. म्हणजे एका वर्षांत १२ बँकांची शेड्यूल्ड बँकांच्या यादींत भर पडली. ह्या ७७ शेड्यूल्ड बँकांपैकी १७ बँका ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर नोंदण्यांत आलेल्या एक्सचेंज बँका आहेत. परराष्ट्रीय व्यापारास भांडवल पुरविणें हेंच त्यांचें प्रमुख कार्य असतें व हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या बंदरांत व प्रमुख व्यापारी केंद्रांत त्यांच्या शाखा आहेत. इतरहि व्यापारास व धंद्यास त्या बँका पैसे देतात व लोकांकडून ठेवी स्वीकारतात. शेड्यूल्ड बँकांपैकीं इंपीरिअल बँक ऑफ इंडिया ही सर्वांत मोठी व महत्त्वाची आहे व तिचे खालोखाल सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, अलाहाबाद बँक, बँक ऑफ बरोडा व पंजाब नॅशनल बँक ह्या इतके दिवस येत असत. गेल्या कांहीं वर्षांत आणखी कित्येक बँकांनीं ठेवी व शाखा ह्यांचे बाबतींत उत्कृष्ट प्रगति करून, शेड्यूल्ड बँकांच्या यादींत वरती अनुक्रम मिळविला आहे. ज्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची बेरीज ५ लक्ष रुपये भरते, अशा बँकांचा उरलेल्या शेड्यूल्ड बँकांत समावेश होतो.

### वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची किमान "किंमत"

रिझर्व्ह बँकेच्या "शेड्यूल"मध्यें प्रवेश मिळविणाऱ्या बँकेचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची " किंमत " किमान ५ लक्ष रुपये असली पाहिजे, असें वर सांगितलें आहे. ह्याचा अर्थ असा, कीं वरील ५ लक्ष रुपयांचे किंमतीची जिंदगी बँकेजवळ खरोखरच आहे, अशी रिझर्व्ह बँकेची खात्री पटून दिली पाहिजे. केवळ ताळेबंदांत ५ लक्ष रुपयांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह दाखवून भागत नाहीं. बँकेचा व्यवहार मुंडाळण्याची पाळी आली, तर सर्व देणें देऊन टाकून, किमान ५ लक्ष रुपये तरी वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांचे पोटीं शिल्लक राहिले पाहिजेत, असा त्याचा अर्थ आहे. जिंदगीचे बाजूस कृत्रिम येणें दाखवून ५ लक्ष रुपयांची भरपाई बँकांना करतां येणार नाहीं. बुडीत कर्जें, डेव्हलपमेंट खर्च, शेअरविक्री खर्च, तोटा, इत्यादि जिंदगीचे बाजूकडील बाबी वजा टाकूनच किमान ५ लक्ष रुपये मोकळे राहिले पाहिजेत. वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची किंमत ५ लक्ष रुपयांचे खालीं जाईल, तर शेड्यूल्ड बँकांचें शेड्यूलत्व हिरावून घेतलें जाईल. ह्यावर उपाय रोख रकमांचे द्वारा वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं वाढवणें हा होय. कांहीं शेड्यूल्ड बँकांचें यादींतून नांव गळाल्याचें मधून मधून प्रसिद्ध होतें, त्याचें स्पष्टीकरण वरील खुलाशानें होईल. ठराविक रकमेखालीं वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांचा आकडा गेला, किंवा बँक मुंडाळण्यांत आली किंवा इतर कारणानें तिनें बँकिंगचा व्यवहार थांबविला, तर तिचें शेड्यूल्ड बँकांतून नांव काढून घेण्यांत येतें. एखादी बँक शेड्यूल्ड बँक आहे, एवढ्यावरूनच तिचेवर भक्कमपणाचें शिक्कामोर्तब झालेलें आहे, असें समजण्याचें कारण नाहीं. सरकारास शंका आली, तर बँक शेड्यूल्ड बँकांचे यादींत बसण्याच्या लायकीची आहे किंवा नाहीं, ह्याची चौकशी करवून निर्णय करण्याचा अधिकार सरकारास आहे.

### बंधनें व सवलती

प्रत्येक शेड्यूल्ड बँकेनें आपल्या चालू व सेव्हिंग्ज खात्यावरील ठेवींच्या ५% व मुदतबंद ठेवींच्या २% रकम रिझर्व्ह बँकेकडे ठेवलीच पाहिजे, असा कायदा आहे, हिंदी बँकिंगचें नियंत्रण करण्यास मदत व्हावी, हा वरील नियमाचा उद्देश आहे. इतर बँकांवर अशा तऱ्हेचें बंधन नाहीं. ठराविक माहितीचा साप्ताहिक तक्ता रिझर्व्ह बँकेकडे भरून पाठविण्याचें बंधन सर्व शेड्यूल्ड बँकांवर आहे. रिझर्व्ह बँक सर्व बँकांची माहिती संकलित करून दर आठवड्यास आकडे प्रसिद्ध करते. रिझर्व्ह बँकेकडे ठराविक रोख रकमा ठेवण्याचें एखाद्या बँकेनें टाळलें, तर रिझर्व्ह बँक तिचेकडून दंडादाखल व्याज घेऊं शकते; नवीन ठेवी स्वीकारण्यास प्रतिबंध करणें व जाणून बुजून नियम मोडल्याबद्दल बँकेच्या डायरेक्टरांस शासन करणें हेहि अधिकार रिझर्व्ह बँकेस आहेत. साप्ताहिक तक्ता पाठविण्यास विलंब लागला, तर प्रत्येक दिवसाच्या विलंबास १०० रुपये दंड पडेल, असा कायदा आहे.

रिझर्व्ह बँकेच्या कायद्याचीं हीं बंधनें शेड्यूल्ड बँकांना पाळावीं लागतात, त्याचप्रमाणें त्यांना रिझर्व्ह बँकेकडून कांहीं सवलतीहि मिळतात. योग्य अटींवर व तारणांवर शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेकडून तात्पुरतीं कर्जें मिळण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे. शेड्यूल्ड बँकांच्या हुंड्यादि रिझर्व्ह बँक डिस्कौंट करते. पैशाची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण करण्याचे संबंधांत शेड्यूल्ड बँकांना विशेष सवलती मिळतात.

( ३१ डिसेंबर, १९४३ अखेर एकूण ७४ शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे माहिती पाठविली. त्यांचेकडील एकूण ठेवींची रकम ६५८ कोटि रुपये होती. त्यांनीं रिझर्व्ह बँकेकडे ११९३ कोटि रुपये ठेवले होते. वास्तविक, नियमाप्रमाणें त्यांनीं ५९ कोटि रुपयेच फक्त रिझर्व्ह बँकेकडे ठेवले असते तरी चालले असते. १९४२ अखेर त्यांनीं अखेच जरूरीपेक्षा अधिक १२ कोटि रुपये रिझर्व्ह बँकेत ठेवले होते. हातांत असलेल्या शिल्लक रकमा वाढत आहेत त्याचा हा परिणाम आहे.)

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

---

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

---

## ★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॅश, टोमॅटो सॉस मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

★

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

---

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.